बृहन्महाराष्ट्र मंडळ

(मध्यवर्ती संस्था, नवी दिल्ली)

# कार्यालय निवडणूक अधिकारी

**(305, उषानगर एक्सटेन्शन, रणजीत हनुमान मेन रोड, पूनम ज्वेलर्स च्या वर, इंदौर (मध्यप्रदेश) 452009)**

इंदुर, गुरुवार 25-12-2025

## निवडणूक अधिसूचना

बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्लीच्या घटना व नियमावलीतील **कलम ९ब-१(अ)** आणि **९ब-१(ब)** अन्वये स्थापित कार्यकारिणीच्या विविध पदांकरिता ही अधिसूचना निर्गमित करण्यात येत आहे. संस्थेच्या घटनेतील **कलम १२** मधील तरतुदींनुसार आणि दिनांक **१० जानेवारी २०२० (शुक्रवार)** रोजी सर्वसाधारण सभेने स्वीकृत आणि स्थापित केलेल्या **'निवडणूक संहिते'**च्या अनुषंगाने, मंडळाच्या सर्वसाधारण सभेकडून ही अपेक्षा करण्यात येत आहे की, त्यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:

**१. पदांची निवड:** घटना व नियमावलीतील नियम आणि उपबंधांचे पालन करून कार्यकारिणीच्या विविध पदांसाठी पात्र सभासदांची निवड करण्यात यावी.

**२. वेळापत्रक:** सदर निवड प्रक्रिया या अधिसूचनेत नमूद केलेल्या विहित वेळापत्रकानुसार पूर्ण करणे अनिवार्य आहे.

सर्व पात्र सभासदांना सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी विहित नियमांचे अनुसरण करून सदर निवडणूक प्रक्रियेत सहभाग नोंदवावा.

### निवडणुकी साठी कार्यकारिणीतील पद आणि त्याची संख्या

| क्रमांक | पदाचे नांव | पदांची संख्या | क्रमांक | पदाचे नांव | पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अध्यक्ष | 1 | 5 | कार्यवाह | 1 |
| 2 | उपाध्यक्ष | 1 | 6 | सहकोषाध्यक्ष | 1 |
| 3 | प्रधान कार्यवाह | 1 | 7 | कार्यवाह (महिला) # | 1 |
| 4 | कोषाध्यक्ष | 1 | {एकूण सात (7) पदांसाठी} | | |

*टीप : # हे पद महिले करिता राखीव असेल , पण सर्व मतदार या पद करिता मतदान करतील.*

### निवडणुकी साठी विभागीय कार्यवाह पद आणि त्याची संख्या

| क्रमांक | विभागाचे नांव | पदांची संख्या | क्रमांक | पदाचे नांव | पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | राजस्थान | 1 | 10 | उत्तर प्रदेश | 1 |
| 2 | कच्छ व सौराष्ट्र | 1 | 11 | उत्तराखंड | 1 |
| 3 | शेष गुजरात | 1 | 12 | तेलंगाना (आंध्र सहित) | 1 |
| 4 | माळवा | 1 | 13 | कर्णाटक | 1 |
| 5 | निमाड | 1 | 14 | केरळ | 1 |
| 6 | मध्य भारत | 1 | 15 | तामिळनाडू | 1 |
| 7 | महाकौशल | 1 | 16 | गोवा | 1 |
| 8 | छत्तीसगढ | 1 | 17 | राष्ट्रीय राजधानी परिक्षेत्र दिल्ली (नोएडा, गाझियाबाद, फरीदाबाद समवेत) | 1 |
| 9 | पूर्वांचल | 1 | 18 | पंजाब, हरियाणा व हिमांचल प्रदेश (एकत्रित) | 1 |
| { अठरा 18 विभागांसाठी प्रत्येकी एक (1) अशी एकूण अठरा (18) पदांसाठी } | | | | | |

निवडणूक अधिकारी
बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली

निरंतर .....2

बृहन्महाराष्ट्र मंडळ
(मध्यवर्ती संघटना, नवी दिल्ली)



## निवडणुकी साठी वेळा पत्रक

| क्र. | निवडणूक संबंधी विविध टप्पे | तिथी पत्रक | |
|---|---|---|---|
| 1 | उमेदवारी अर्ज उपलब्ध होतील | 01/01/2026 (गुरुवार) सकाळी 11:00 पासून | 24/01/2026 (शनिवार) सायं 07:00 वा. पर्यंत |
| 2 | उमेदवारी अर्ज प्राप्त करण्याची मुदत | 12/01/2026 (सोमवार) सकाळी 09:00 पासून | 24/01/2026 (शनिवार) सायं 08:00 वा. पर्यंत |
| 3 | उमेदवारी अर्जाचे सूक्ष्म निरीक्षण | 28/01/2026 (बुधवार) सकाळी 11:00 वा. नंतर | आवश्यक असल्यास पुढील दिवशी पण करण्यात येईल |
| 4 | पदानुरूप परीक्षण उपरांत उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्यांची यादीचे प्रकाशन | 30/01/2026 (शुक्रवार) सकाळी 11:00 वा. नंतर | - |
| 5 | उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत | 04/02/2026 (बुधवार) सायं 08:00 वा. पर्यंत | - |
| 6 | पदानुरूप उमेदवारांची अंतिम यादी घोषणा | 05/02/2026 (गुरूवार) सकाळी 11:00 नंतर | - |
| 7 | मतदान (आवश्यक असल्यास) अधिवेशन शहर देवास येथे नियोजित स्थळी | 01/03/2026 (रविवार) | सकाळी 11:00 ते सायंकाळी 04:00 वा. पर्यंत |
| 8 | मतमोजणी व निकाल | 01/03/2026 (रविवार) | मतदान समाप्ती नंतर मतमोजणी मतमोजणी समाप्ती नंतर निकाल घोषणा |
| 9 | निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची कालमर्यादा | 31/03/2026 (मंगळवार) | 18:00 वा. पर्यंत |

**सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी की अपरिहार्य कारणास्तव मतदानाच्या तिथी व वेळापत्रकात फेरबदल केला जाऊ शकेल ज्याची सूचना यथासंभव लवकरात लवकर इंटरनेट संकेतस्थळ व व्हॉटसप्प माध्यमातून प्रसिद्ध करण्यात येईल.** उमेदवारी अर्ज आणि त्या संबंधीच्या पुढील प्रक्रीयेशी निगडीत तपशीलवार माहिती वेगळ्या पत्रकात प्रसिद्ध केली गेली आहे जी बृहन्महाराष्ट्र मंडळ इंटरनेट संकेत स्थळावर, व्हॉटसप्प माध्यम व टपालमार्गे प्रेषित सूचनापत्रात उपलब्ध आहे.

आज दिनांक 25 डिसेंबर 2025, गुरुवार रोजी इंदूर येथे माझ्या सही व शिक्क्यासह ही अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली.

श्रीमती शरयू भालचंद्र वाघमारे
निवडणूक अधिकारी

निवडणूक अधिकारी
बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली

प्रतिलिपी : 1. प्रधान कार्यवाह , (कार्यकारीणी आणि सभासदांच्या सूचने करिता )
2. सूचना प्रौद्योगिकी प्रभारी, (सभासदांना इंटरनेट संकेतस्थळ माध्यामांतून सूचनार्थ)

# कार्यालय निवडणूक अधिकारी

**(305, उषानगर एक्सटेन्शन, रणजीत हनुमान मेन रोड, पूनम ज्वेलर्स च्या वर, इंदौर (मध्यप्रदेश) 452009)**

इंदूर, गुरुवार 25-12-2025

## उमेदवारी अर्ज संबंधी सूचना

बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली या संस्थेच्या कार्यकारिणीतील सर्व पदांकरिता निवडणूक संबंधीची अधिसूचना आज दिनांक 25-12-2025 (गुरुवार) रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे . या अधिसूचनेच्या अनुषंगाने उमेदवारी अर्ज संबंधीची संपूर्ण प्रक्रिया एतद्द्वारे या सूचनेत प्रसिद्ध केली जात आहे. समस्त उमेदवार, प्रस्तावक आणि अनुमोदक यांना निवेदन आहे कि त्यांनी या सूचनेचे व्यवस्थित अध्ययन करावे आणि काही शंका असल्यास किंवा काही खुलासा हवा असल्यास याच सूचनेत नमूद केलेल्या संपर्क माध्यमांपैकी कुठल्याही माध्यामातून लेखी स्वरूपात संपर्क करावा.

## उमेदवारी अर्ज संबंधी महत्वपूर्ण तारखा

| क्र. | उमेदवारी अर्ज संबंधी विविध टप्पे | तिथी पत्रक | |
|---|---|---|---|
| 1 | उमेदवारी अर्ज उपलब्ध होतील | 01/01/2026 (गुरुवार) सकाळी 11:00 पासून | 24/01/2026 (शनिवार) सायं 07:00 वा. पर्यंत |
| 2 | उमेदवारी अर्ज प्राप्त करण्याची मुदत | 12/01/2026 (सोमवार) सकाळी 09:00 पासून | 24/01/2026 (शनिवार) सायं 08:00 वा. पर्यंत |
| 3 | उमेदवारी अर्जाचे सूक्ष्म निरीक्षण | 28/01/2026 (बुधवार) सकाळी 11:00 वा. नंतर | आवश्यक असल्यास पुढील दिवशी पण करण्यात येईल |
| 4 | पदानुरूप परीक्षण उपरांत उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्यांची यादी चे प्रकाशन | 30/01/2026 (शुक्रवार) सकाळी 11:00 वा. नंतर | |
| 5 | उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत | 04/02/2026 (बुधवार) सायं 08:00 वा. पर्यंत | |
| 6 | पदानुरूप उमेदवारांची अंतिम यादी घोषणा | 05/02/2026 (गुरुवार) सकाळी 11:00 नंतर | |

## उमेदवारी अर्ज कसे उपलब्ध होतील

उमेदवारी अर्ज प्राप्त करावयास समस्त इच्छुक सभासद खाली नमूद चार पैकी कुठल्याही विकल्पाचा अवलंब करू शकतात:

1. बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली च्या संकेत स्थळ (website) www.bmmindia.org.in येथे उपलब्ध "निवडणूक 2026" या विकल्पांतर्गत उमेदवारी अर्ज डाऊनलोड करू शकतात.
2. निवडणूक अधिकारीच्या ईमेल elect2026@bmmindia.org.in किंवा मंडळाच्या अधिकृत ईमेल bmm.officialpublicity@gmail.com वर निवेदन पाठवून आपल्या व्हॉटसप/ईमेल वर मागवू शकतात
3. निवडणूक अधिकारी च्या व्हॉटसप संपर्क क्रमांक **9424688400** वर निवेदन पाठवून आपल्या व्हॉटसप/ईमेल वर मागवू शकतात

निवडणूक अधिकारी
बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली

अविरत ...(2)

**उमेदवारी अर्जांची निवडणूक अधिकारी द्वारे प्राप्ती**

1. स्वच्छ आणि स्पष्ट अक्षरांत भरलेला उमेदवारी अर्ज कुठल्याही उमेदवारा तर्फे आवश्यक संलग्नकांसह आणि प्रत्येक अर्जा करिता रुपये शंभर फक्त (रु.100/-) असे उमेदवारी अर्ज शुल्क भरले असल्याच्या पावती सह या सूचना पत्रकात निर्धारित अधिकृत पत्त्यावर भौतिक स्वरूपात स्वतः द्वारे किंवा भारतीय पोष्टच्या टपाल माध्यमाने जमा केला जाऊ शकेल. **कुठल्याही परिस्थितीत व्हॉटसप/ईमेल किंवा अन्य डिजिटल माध्यमांतून अर्ज स्वीकारला जाणार नाही.**

2. सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी कि उमेदवारी अर्ज शुल्क रुपये शंभर फक्त (रु.100/-) अप्रतिदेय असेल अर्थात कुठल्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही व कोणाही अन्य उमेदवारा करिता देखील वापरले जाऊ शकणार नाही.

3. उमेदवारी अर्ज शुल्क रुपये शंभर फक्त (रु.100/-) नेफ्ट(NEFT) किंवा आय.एम.पी.एस. (IMPS) किंवा कुठल्याही वॉलेट/यु.पी.आई. इत्यादी माध्यमांतून खाते अंतरण (Account Transfer) द्वारा खाली नमूद बँक खात्यात भरले जाऊ शकेल. **अंतरण झाल्याची पावती/सूचना अंतरण संदर्भ संख्येसह (transaction reference number) सह किंवा भरणा केल्याच्या स्क्रीनशॉट (screenshot) सह आपल्या अर्जा सोबत संलग्न करावी.** अर्जाच्या सूक्ष्म छाननीच्या वेळेस ह्या शुल्क पावती ची शहानिशा बँकेच्या रेकॉर्ड वरून केली जाईल. आणि मंडळा शुल्क प्राप्त नसेल झाले तर अर्ज रद्द केला जाईल. कुठल्याही परिस्थितीत खात्यात रोख रक्कम भरू नये. रोख रक्कम भरल्यास अर्ज ग्राह्य धरला कानार नाही आणि निरस्त करण्यात येईल.

   बँक खात्याची संबंधित माहिती

| | | |
|---|---|---|
| खातेदाराचे नांव | : | बृहन्महाराष्ट्र मंडळ |
| खात्याचे स्वरूप व खाते क्रमांक | : | सेव्हिंग खाते क्र. **20055234334** |
| बँक आणि शाखा | : | बँक ऑफ महाराष्ट्र , करोलबाग शाखा, नवी दिल्ली |
| आय.एफ.एस. कोड (IFSC) | : | **MAHB0000140** |

4. सर्व प्रस्तावकांनी उमेदवारीच्या अर्जासोबत प्रस्तावक, अनुमोदक आणि उमेदवार ह्या तिघा व्यक्तींची ओळख आणि निवास स्थान स्थापित करण्या करिता आधारकार्ड, पासपोर्ट, मतदाता परिचय पत्र किंवा ड्रायव्हिंग लायसेन्स ह्या पैकी कुठलेही फोटो युक्त सरकारमान्य परिचयपत्राची स्वाक्षरीयुक्त स्वयंप्रमाणित प्रत संलग्न करावी ज्याच्या वर नांव आणी पत्ता स्पष्ट उल्लेखित असेल जो मतदाता यादी प्रमाणे असेल. नाव व पत्त्यात तफावत आढळल्यास अर्ज निरस्त केला जाईल.

5. भरलेला उमेदवारी अर्ज आवश्यक संलग्नकांसह वैयक्तिक रित्या उपस्थित होऊन किंवा टपाल माध्यमांतून किंवा कोणा ही संदेशवाहक मार्फत निवडणूक अधिकाऱ्या समक्ष निर्धारित कालावधीत निर्धारित वेळेतच प्रस्तुत केला जाऊ शकेल . अर्ज प्राप्त झाल्यावर निवडणूक अधिकारी अर्ज प्राप्ती ची पावती देईल ज्याच्या वर अर्ज प्राप्तीची दिनांक आणि वेळ नमूद असेल. सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी की कुठल्या ही परिस्थितीत अर्ज प्राप्ती ची वेळ लोप पावल्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर विचार केला जाणार नाही. तरी **टपाल माध्यमांतून होणाऱ्या विलंब धरूनच अर्ज पाठवावा. टपाल प्रेषण पावती निवडणूक अधिकारीच्या व्हॉटसप्प क्रमांकावर अवश्य प्रेषित करावी.**

6. हितचिंतक सभासद श्रेणी चे सभासद वगळता इतर समस्त सभासद श्रेणींचे सभासद जे निवडणूक घोषणा तिथीस सभासद आहेत आणि ज्यांचे बृहन्महाराष्ट्र मंडळा हितार्थ कुठले ही आर्थिक देणे नाहीये, अर्थात ज्यांचे नांव मतदाता यादीत आहे, असे सभासद मतदाता, उमेदवार, प्रस्तावक किंवा अनुमोदक होण्यास पात्र असतील.

**निवडणूक अधिकारी**
बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली

अविरत ...(3)

7. एक उमेदवाराच्या द्वारे प्रत्येक पदा करिता अधिकतम तीन उमेदवारी अर्ज भरले जाऊ शकतात अर्थात अधिसूचित कितीही पद ज्याच्या करिता उमेदवार पात्र आहे त्या सर्व पदांकरिता उमेदवाराच्या नांवाचा प्रस्ताव केला जाऊ शकतो. पण प्रत्येक उमेदवारी अर्जात प्रस्तावक आणि अनुमोदक भिन्न भिन्न व्यक्ती असणे बंधनकारक असेल. तसंच उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तिथी पर्यंत अश्या उमेदवारास फक्त एक पद ठरवून अन्य पदांच्या करिताचे प्रस्ताव मागे घ्यावे लागतील. जर कोणाही उमेदवाराचे नांव उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तिथी उलटल्या नंतर एका पेक्षा जास्त पद करिता शेष असतील तर त्या उमेदवाराचे सर्व पदांकरीताचे प्रस्ताव निरस्त केले जातील.
8. कुठल्याही सभासदास निवडणूक अधिकारी द्वारा प्रसिद्ध केल्या गेलेल्या मतदाता यादीत त्यांचे नांव असल्यासच उमेदवार, प्रस्तावक किंवा अनुमोदक होण्याची पात्रता असेल.
9. संलग्न संस्थेचे प्रतिनिधि उमेदवार, प्रस्तावक किंवा अनुमोदक होण्यास अपात्र असतील. संस्थागत प्रतिनिधींना फक्त मतदानाचा अधिकार असेल .

<u>उमेदवारी अर्जांचे सूक्ष्म निरीक्षण</u>

1. प्राप्त समस्त उमेदवारी अर्जांचे सूक्ष्म निरीक्षण निवडणूक संहितेत दिलेल्या नियमांप्रमाणे केले जाईल.
2. अर्जा संबंधीची स्वीकृती किंवा अस्वीकृती संबंधित अर्जदारांस अर्जात नमूद दूरध्वनी वरून कळविली जाईल आणि तसंच अर्जात नमूद टपाल पत्त्यावर भारतीय टपाल खात्याच्या "नोंदणीकृत टपाल (Registered Post)" किंवा "स्पीड पोस्ट (Speed Post)" ह्या माध्यमांतून पण पाठविली जाईल.
3. कुठल्याही उमेदवारांनी एका पेक्षा जास्त अर्ज दाखल केले असल्यास किमान एक अर्ज स्वीकृत असल्यास देखील निवडणुकीत उमेदवार असण्यास पात्रता असेल .

<u>उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज प्राप्ती</u>

1. उमेदवारी अर्जाचे सूक्ष्म निरीक्षण पश्चात निवडणुकीसाठी स्वीकृत समस्त अर्ज करणारे निवडणुकीस पात्र ठरलेले उमेदवार ठराविक प्रारूपात (संलग्न आहे) आपली उमेदवारी मागे घ्यायचा अर्ज सादर करून आपली उमेदवारी मागे घेऊ शकतात.
2. उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज निवडणूक वेळापत्रकात नमूद कालावधीत केले जाऊ शकतात.
3. प्राप्त अर्जावर उमेदवारास उमेदवारी मागे घेण्याची अनुमती दिली जाईल. तत्पश्चात दूरध्वनी वरून आणि लेखी स्वरूपात संबंधित उमेदवारास उमेदवारी रद्द केल्या संबंधी सूचना संभव असल्यास समक्ष किंवा मूळ अर्जात नमूद टपाल पत्त्यावर भारतीय टपाल खात्याच्या "नोंदणीकृत टपाल (Registered Post)" किंवा "स्पीड पोस्ट (Speed Post)" ह्या माध्यमांतून पाठविली जाईल .
4. कुठल्याही उमेदवारांनी एका पेक्षा जास्त अर्ज दाखल केले असल्यास आणि ते तसे स्वीकृत झाले असल्यास ज्या पदाची उमेदवारी मागे घेण्यात आली असेल त्या पदांकरिता चे सर्व स्वीकृत उमेदवारी अर्ज रद्द होतील.

निवडणूक अधिकारी
बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली

अविरत ...(4)

5. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तिथी पर्यंत ज्या उमेदवार करिता एका पेक्षा जास्त पदा करीताचे निवडणूक अधिकारी द्वारा स्वीकृत प्रस्ताव शेष असतील अश्या उमेदवारास फक्त एक पद ठरवून अन्य पदांच्या करिताचे प्रस्ताव मागे घ्यावे लागतील. जर कोणाही उमेदवाराचे नांव / अर्ज / प्रस्ताव, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तिथी उलटल्या नंतर एका पेक्षा जास्त पद करिता शेष असतील तर त्या उमेदवाराचे सर्व पदांकरीताचे प्रस्ताव निरस्त केले जातील.

**उमेदवारांची अंतिम यादीचे प्रकाशन**

1. निवडणूक वेळापत्रकाच्या प्रमाणे उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा कालावधी लोप / पूर्ण झाल्या पश्चात उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध केली जाईल. ही यादी कार्यकारिणीच्या प्रत्येक पद करिता आणि तसंच प्रत्येक विभागातील विभागीय कार्यवाह या पद करिता असेल .
2. ही यादी मतदाता सभासदांच्या सोयी करिता मंडळाच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिद्ध केली जाईल तसंच ही यादी अधिवेशन स्थळी निवडणूक कार्यालयाच्या सूचना फलकावर दिनांक 01/03/2026 ला देखील लावण्यात येईल .
3. या यादीत कुठल्याही पदा करिता जर एकच व्यक्तीचा अर्ज स्वीकृत झाला असेल तर हे पद मतदाना करिता नसेल आणि निवडणूक निकालांत निर्विरोध निवडले गेल्या संबंधीची घोषणा केली जाईल.
4. या यादीत कुठल्याही पदा करिता जर एकाही व्यक्तीचा स्वीकृत अर्ज शेष नसेल निवडणूक निकालांत पद रिक्त असल्या संबंधीची घोषणा केली जाईल .

**मतदाता यादी**

1. समस्त सभासद आणि समस्त उमेदवार, प्रस्तावक आणि अनुमोदक यांना कळविण्यात येत आहे कि बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली चे प्रधान कार्यवाह आणि कोषाध्यक्ष यांनी प्रमाणित केलेली, मताधिकार प्राप्त असलेली मतदाता यादी मंडळाच्या इंटरनेट संकेत स्थळावर www.bmmindia.org.in सर्व इच्छुक जणांच्या सुलभ संदर्भाखातर दिनांक 30-11-2025 पासून उपलब्ध केली गेलेली आहे.
2. ही यादी मंडळाचे संरक्षक सभासद, मंडळाचे आजीव सभासद आणि मंडळाशी संलग्न संस्थागत सभासद अश्या तीनही सभासद श्रेणीकरीता पृथक पृथक रीत्या प्रसिद्ध केली जात आहे.
3. या तीनही यादीतील कुठल्याही मतदाता संबंधी कोणाही मताधिकार प्राप्त सभासदास जर काही आपत्ती असेल तर त्यांना आपली आपत्ती लेखी स्वरूपात निवडणूक अधिकारीला याच सूचनेत उल्लेखित कुठल्याही संपर्क माध्यमा द्वारे प्रस्तुत करता येईल ज्यावर निवडणूक संहितेत नमूद नियम आणि कालावधी प्रमाणे निर्णय घेवून निराकरण करण्यात येईल. कोणाचे नाव सुटले असल्यास त्या सभासदांनी आपल्या मंडळाच्या परिचय पत्राच्या किंवा सभासद देणगीच्या पावतीच्या छायाप्रतीसह निवडणूक अधिकारीकडे दिनांक 25 फेब्रुवारी 2026 पर्यंत लेखी अर्ज करावा. मंडळाद्वारे सत्यापना नंतर त्यांचा मताधिकार बहाल करण्यात येईल.
4. सर्व निराकृत आपत्तींची दखल घेवूनच अधिवेशन स्थळी निवडणूक कार्यालयाच्या फलकावर दिनांक 01/03/2026 ला मतदाता यादी उपलब्ध केली जाईल.

अविरत...(5)

निवडणूक अधिकारी
बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली

बृहन्महाराष्ट्र मंडळ
(मराठी संघटना, नवी दिल्ली)



5. निराकृत आपत्तींशी सहमती नसल्यास आपत्तीकर्ता निवडणूक संहीतेत दिलेल्या नियमांप्रमाणे निवडणूक न्यायाधीकराणाशी अधिवेशन स्थळी संपर्क करु शकतात.

**संपर्क माध्यम**

**समस्त उमेदवार, प्रस्तावक आणि अनुमोदक यांना निवेदन आहे कि त्यांनी काही शंका असल्यास किंवा काही खुलासा हवा असल्यास खाली नमूद कुठल्याही विकल्पांवाये संपर्क केला जाऊ शकेल. प्रत्येक संपर्काचे रेकॉर्ड ठेविले जाईल म्हणून कृपया मोबाईल वर प्रश्न विचारू नये. फक्त लेखी विचारलेल्या प्रश्नांनाच उत्तर दिले जाईल.**

1. ईमेल elect2026@bmmindia.org.in वर निवेदन पाठवून
2. व्हॉटसप संपर्क क्रमांक **9424688400** वर निवेदन पाठवून
3. किंवा टपाल माध्यमांतून खालील पत्त्यावर पत्र लिहून

**श्रीमती शरयू भालचंद्र वाघमारे**
**निवडणूक अधिकारी (बृहन्महाराष्ट्र मंडळ)**
**305, उषानगर एक्सटेन्शन, रणजीत हनुमान मेन रोड,**
**पूनम ज्वेलर्स च्या वर, इंदौर (मध्यप्रदेश) 452009**

याच पत्त्यावर उमेदवारी अर्ज पण स्वीकारले जातील. विस्तृत उमेदवारी अर्ज प्रारूप आणि उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज प्रारूप संलग्न आहे.

**या नंतरचे सर्व आदेश / सूचना प्रसिद्ध झाल्यावर मंडळाच्या इंटरनेट संकेत स्थळावर अर्थात www.bmmindia.org.in वर उपलब्ध करण्यात येतील आणि उपलब्ध व्हॉटसप्प समूहांवर प्रसिद्ध केल्या जातील. तरी संबंधितांनी या संकेत स्थळावर नियमित भेट देत रहावी.**

आज दिनांक 25 डिसेंबर 2025, गुरुवार रोजी इंदूर येथे माझ्या सही व शिक्क्यासह ही सूचना प्रसिद्ध करण्यात आली.

Swaghmare

श्रीमती शरयू भालचंद्र वाघमारे
निवडणूक अधिकारी

**निवडणूक अधिकारी**
**बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली**

संलग्न: प्रारूप 2 – उमेदवारीचा अर्ज
प्रारूप 5 – उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज

प्रतिलिपी : 1. प्रधान कार्यवाह , (कार्यकारीणी आणि सभासदांच्या सूचने करिता )
2. सूचना प्रौद्योगिकी प्रभारी, (सभासदांना इंटरनेट संकेतस्थळ माध्यामांतून सूचनार्थ)

मूल्य : रु.100/-

# उमेदवारी अर्ज

प्रारूप क्र. 2

**(बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी करिता)**

**(ह्या अर्जा मध्ये जे शब्द लागू नसतील ते निरस्त करावे)**

(ह्या अर्जा सोबत प्रस्तावक, अनुमोदक आणि उमेदवार यांनी सरकारमान्य फोटो युक्त परिचयपत्र संलग्न करावे)

**भाग 1 (प्रस्तावक द्वारे वापरावा)**

मी ______________________ वय _____ वर्षे , सभासद क्रमांक __________सभासद श्रेणी __________

विभाग ______________________ मतदाता यादीत माझा मतदार क्रमांक __________

निवासी ______________________________________________

______________________________________________

एतदद्वारे श्री/श्रीमती/सुश्री ______________________ वय _____ वर्षे , ज्यांचा सभासद क्रमांक

__________सभासद श्रेणी __________ विभाग ______________________आहे, यांना

__________ पदा करिता उमेदवार म्हणून प्रस्तावित करतो . उमेदवाराचा पत्ता __________

______________________________________________

आहे आणि उमेदवार बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या नियमां प्रमाणे निवडणुकीत सहभागी होण्यास पात्र आहे .

उमेदवाराचे नांव मतदार यादीत पृष्ठ क्र. __________ वर अनुक्रमांक __________ वर नमूद आहे .

उमेदवाराचे नवीनतम छायाचित्र नियत स्थानावर संलग्न आहे .

उमेदवाराचा
पासपोर्ट आकाराचा
नवीनतम फोटो
येथे चिकटवावा

## घोषणा

मी ______________________ वय ___ वर्षे , सभासद क्रमांक __________सभासद श्रेणी __________

मतदार यादीत नाव पृष्ठ क्र.________ अनुक्रमांक __________ वर असून विभाग ______________________

आहे, एतदद्वारे ही घोषणा करतो कि मी वर दिलेली समस्त माहिती पूर्णपणे सत्य आहे आणि मला हे माहित आहे कि वरील माहितीत काही त्रुटी आढळून आल्यास माझे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे सभासदत्व निरस्त होऊ शकते .

स्थळ__________________

दिनांक__________________

(प्रस्तावकाचे नांव व सही)

---

भाग 2 (अनुमोदक द्वारे वापरावा)

मी ______________________ वय _____ वर्षे , सभासद क्रमांक __________सभासद श्रेणी __________

विभाग ______________________ निवासी______________________

एतदद्वारे श्री/श्रीमती/सुश्री ______________________ वय _____ वर्षे , ज्यांचा सभासद क्रमांक__________

सभासद श्रेणी ________ विभाग ______________________आहे, यांच्या वरील प्रमाणे प्रस्तावित उमेदवारीचे अनुमोदन करत आहे . उमेदवार बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या नियमां प्रमाणे निवडणुकीत सहभागी होण्यास पात्र आहे .

## घोषणा

मी ______________________ वय ___ वर्षे , सभासद क्रमांक __________सभासद श्रेणी __________

मतदार यादीत नाव पृष्ठ क्र.________ अनुक्रमांक __________ वर असून विभाग ______________________

आहे, एतदद्वारे ही घोषणा करतो कि मी वर दिलेली समस्त माहिती पूर्णपणे सत्य आहे आणि मला हे माहित आहे कि वरील माहितीत काही त्रुटी आढळून आल्यास माझे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे सभासदत्व निरस्त होऊ शकते .

स्थळ__________________

दिनांक__________________

(अनुमोदकाचे नांव व सही)

## भाग 3

**(उमेदवार द्वारे वापरावा)**

मी ______________________________ वय ______ वर्षे , सभासद क्रमांक ________ सभासद श्रेणी __________ विभाग ____________________ मतदाता यादीत मतदार यादीत पृष्ठ क्र. ____________ वर अनुक्रमांक ________ वर माझे नाव नमूद आहे. माझा संपूर्ण पत्ता ______________________________________________ आहे,

एतदद्वारे वरील भाग 1 आणि भाग 2 मध्ये अनुक्रमे प्रस्तावित आणि अनुमोदित ________________ पदा करिता माझ्या उमेदवारीस माझी स्वीकृती देत आहे .

मी घोषणा करत आहे कि :

1. **मी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या घटना व नियमावली आणि निवडणूक संहितेत उल्लेखित समस्त नियमां प्रमाणे उमेदवारीस पात्र आहे.**
2. **मी प्रस्तावित उमेदवारीच्या पदा वर मागील दोन कार्यावधीत लागोपाठ दोन्ही वेळा कार्य केलेले नाही.**
3. मला कुठल्याही प्रकारच्या गुन्ह्या करिता आज पर्यंत कारावासाची शिक्षा झाली नाही .
4. ह्या अर्जात माझ्या बद्दल पुरविलेली सर्व माहिती सत्य आहे .
5. मला स्पष्ट कल्पना आहे कि ह्या अर्जातील माझ्या संबंधी ची कुठलीही माहित असत्य किंवा त्रुटीपूर्ण आढळून आल्यास माझे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे सभासदत्व निरस्त होऊ शकते .
6. उमेदवारी अर्ज प्राप्त झाल्यावर निवडणूक अधिकारी द्वारे वैयक्तिक रित्या व्हॉटसप्प क्रमांक ________________ वर संपर्क करण्यास आणि निवडणूक निमित्त स्थापित करण्यात येणाऱ्या अस्थायी व्हॉटसप्प समुहात हा क्रमांक जोडण्यास माझी विना अट पूर्ण सहमती आहे.

स्थळ ________________

दिनांक ________________ (उमेदवाराचे नांव व सही)

## भाग 4

**(निवडणूक अधिकारी द्वारे वापरावा)**

उमेदवारी अर्जाचा अनुक्रमांक __________

श्री/श्रीमती/सुश्री ______ (उमेदवाराचे नांव) ____________ यांच्या ____________ पदा किता उमेदवारी अर्ज मला माझ्या कार्यालयात दिनांक ________ वेळ __________ वाजता टपाल माध्यमाने / व्यक्तीगत रीत्या उपस्थित राहून श्री/श्रीमती/सुश्री ____________________ ( उमेदवार / प्रस्तावक / अनुमोदक / संदेशवाहक ) यांचे कडून प्राप्त झाला .

स्थळ ________________

दिनांक ________________ (निवडणूक अधिकारी चे नांव, सही, शिक्का)

## भाग 5

**(निवडणूक अधिकारी द्वारे सूक्ष्म निरीक्षण पश्चात निर्णय लिहिण्यास वापरावा)**

उमेदवारी अर्जाचा अनुक्रमांक __________

मी श्री/श्रीमती/सुश्री ______(उमेदवाराचे नांव)______________ यांच्या ______________ पदा किता उमेदवारी अर्जाचे सूक्ष्म निरीक्षण केले असून

1. मी पुरविलेल्या समस्त माहिती आणि संलग्न दस्तावेजांशी संतुष्ट आहे आणि उमेदवारी स्वीकृत करत आहे .
2. मी पुरविलेल्या माहिती आणि संलग्न दस्तावेजांशी संतुष्ट नाही आणि उमेदवारी अस्वीकृत करत आहे .
   अस्वीकार करण्याचे कारण ______________________________________________

   ______________________________________________________________

स्थळ ____________________

दिनांक ____________________ (निवडणूक अधिकारी चे नांव, सही, शिक्का)

## भाग 6

**(निवडणूक अधिकारी द्वारे उमेदवारी अर्ज प्राप्ती पावती आणि सूक्ष्म निरीक्षण सूचना म्हणून वापरण्यात यावा )**

उमेदवारी अर्जाचा अनुक्रमांक __________

श्री/श्रीमती/सुश्री ______(उमेदवाराचे नांव)______________ यांच्या ______________ पदा करिता उमेदवारी अर्ज मला माझ्या कार्यालयात दिनांक __________ वेळ __________ वाजता टपाल माध्यमाने / व्यक्तीगत रीत्या उपस्थित राहून श्री/श्रीमती/सुश्री ______________________ ( उमेदवार / प्रस्तावक / अनुमोदक / संदेशवाहक ) यांचे कडून प्राप्त झाला .

प्राप्त समस्त अर्जाचे सूक्ष्म निरीक्षण दिनांक __________ वार ______________ वेळ ______________ वाजता

स्थळ ______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

येथे करण्यात येईल . त्या वेळेस आपण उमेदवार किंवा आपले अधिकार पत्र घेऊन येणारे आपले प्रतिनिधी स्वखर्चाने उपस्थित राहू शकतात .

स्थळ ____________________

दिनांक ____________________ (निवडणूक अधिकारी चे नांव, सही, शिक्का)

**उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज**

प्रारूप क्र. 5

**भाग 1**

**(उमेदवाराच्या वापरासाठी)**

प्रति.

माननीय निवडणूक अधिकारी महोदय

____________________________________

____________________________________

**विषय : बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी निवडणुकीतून उमेदवारी मागे घेण्या संबंधी निवेदन**

**संदर्भ : उमेदवारी अर्जाचा अनुक्रमांक ___________**

आदरणीय निवडणूक अधिकारी महोदय ,

आपल्या निदर्शनास आणू इच्छितो कि मी ___________________________________________ सभासद क्रमांक __________ , मतदाता यादीतील मतदाता क्रमांक __________ सांप्रत अधिसूचित बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी च्या ______________ पदा करिता प्रस्तावित माझ्या उमेदवारीस सहमती प्रदान केली होती . समस्त अर्जांच्या सूक्ष्म निरीक्षणोपरांत माझा उमेदवारी अर्ज आपल्या द्वारे स्वीकृत करण्यात आला होता .

मी आपणांस एतदद्वारे सूचित करू इच्छितो कि आता मी माझी उमेदवारी मागे घेऊ इच्छितो . तरी आपणांस नम्र निवेदन आहे कि कृपया आपण मला माझे उमेदवार म्हणून नांव मागे घेण्यास अनुमती द्यावी . हा अर्ज मी कुठल्याही प्रकाराच्या दबाव किंवा तणाव रहित अवस्थेत स्वेच्छेने वेळापत्रकात नमूद कालावधीत सादर करत आहे . कृपया अर्ज स्वीकृत करावा ही विनंती .

स्थान:

दिनांक:

(उमेदवार नांव आणि सही)

**भाग 2**

**(निवडणूक अधिकारीच्या वापरासाठी)**

उमेदवारी अर्जाचा अनुक्रमांक ___________

श्री/श्रीमती/सुश्री _______(उमेदवाराचे नांव)_______________ यांच्या ______________ पदा किता उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज मला माझ्या कार्यालयात दिनांक __________ वेळ ___________ वाजता टपाल माध्यमाने / व्यक्तीगत रीत्या उपस्थित राहून श्री/श्रीमती/सुश्री ____________________________ ( उमेदवार / प्रस्तावक / अनुमोदक / संदेशवाहक ) यांचे कडून प्राप्त झाला . प्राप्त अर्जास मी स्वीकृती देत आहे आणि आता श्री/श्रीमती/सुश्री _______(उमेदवाराचे नांव)_______________ यांची उमेदवारी रद्द करण्यात येत आहे .

स्थळ ____________________

दिनांक ____________________

(निवडणूक अधिकारी चे नांव, सही, शिक्का)